# भारताचा अर्थसंकल्प २०२३-२४

**-डॉ. प्रशांत हरमकर**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती

**प्रस्तावना :-**

यावर्षी भारताचा अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी 2023 रोजी केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केला. सलग पाचव्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या अर्थमंत्री ठरल्या आहे. कारोना साथी नंतर, रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर, जागतिक अर्थव्यवस्थेची स्थिती बिकट असतांना, महागाईचा दर वाढत असतांना, भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्यासह विकासाचा वेग वाढण्याच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्प 2023-2024 मांडण्यात आला आहे.

अर्थसंकल्प 2023-2024 मांडत असतांना अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी आठ वेगवेगळ्या गटासोबत प्री-बजेट बैठक आयोजित करण्यात आली होती. अर्थसंकल्प तयार करण्याचा तो एक भाग असतो. महसुल विभाग, उद्योग संघटना, चेम्बर्स ऑफ कॉमर्स, शेतकरी संघटना, ट्रेड युनियन यांच्याशी पहिल्या भागामध्ये चर्चा केली जाते. दुसऱ्या भागामध्ये विविध मंत्रालये राज्य आणि केंद्रशासीत प्रदेश, स्वायत्ता संस्था, संरक्षण दल, आर्थिक व्यवहार विभाग यांच्याशी चर्चा करून परिपत्रके काढली जातात. या परिपत्रकामधून खर्चाचा अंदाज लक्षात घेतला जातो. यानंतर विविध विभागांना किती रक्कम देण्यात यावी यावर चर्चा केली जाते. याकरीता वित्त मंत्रालयाकडून आराखडा तयार केला जातो. ही सर्व अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी तयारी वित्त विभाग व अर्थमंत्री करित असतो.

**अंदाजपत्रकाचा अर्थ व उद्दिष्ट :-**

अंदाजपत्रक म्हणजे वित्तीय दस्ताऐवज असतो. यामध्ये जमा आणि खर्चाचा अंदाज व्यक्त केला जातो. याद्वारे नियोजित उत्पन्न व नियोजित खर्चाची मांडणी केली जाते. अंदाजपत्रक अथवा बजट अर्थव्यवस्थेचे यश आणि सुरक्षिततेचा आधारस्तंभ असतो. यामधून खर्च आणि उत्पन्न निर्मिती होते. आधिक्य बजट, संतुलित बजट आणि तुटीचे बजट हे तीन अंदाजपत्रकाचे प्रकार आहेत. बजटद्वारे वित्तीय लक्ष्यप्राप्ती अर्थपूर्ण खर्च करते, भविष्यासाठी बचती निर्माण करते, आपातकालीन निधी उभारते आणि खर्च करायच्या सवयीचे विश्लेषण केल्या जाते.

एका आर्थिक वर्षात उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन साध्य केल्या जाते. एकूणच आपण पैसा कसा निर्माण करणार आहोत आणि खर्च कशा पद्धतीने करणार आहोत याचे नियोजन म्हणजे बजट अथवा अंदाजपत्रक असते. सरकारला उत्पन्न हे कर आणि महसुल, सरकारी शुल्क आणि दंड लाभांश उत्पन्न, कर्जावरील व्याज इत्यादी स्वरूपात प्राप्त होते. या प्राप्त उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. विविध योजनाकरीता निधी आंवटित केल्या जातो. आर्थिक विकासाला गती दिल्या जाते, दारिद्रय आणि बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न केला जातो आणि पायाभुत सुविधा निर्माण केल्या जातात. अर्थसंकल्प प्रसिद्ध होण्याच्या एक दिवस पूर्व भारताचा आर्थिक पाहाणी अहवाल सादर केल्या जातो. यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची मागील आर्थिक वर्षातील स्थितीचा आढावा घेतला जातो. यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती समाधानकारक दर्शविली आहे.

**2023-2024 च्या अंदाजपत्रकाचे विश्लेषण: -**

अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी बजट 2023-2024 प्रथमत: अमृतकाळात प्रसिध्द होत असल्याचे म्हटले आहे. 2023-2024 चे अंदाजपत्रक म्हणजे यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या अंदाजपत्रकांना पुढाकार देऊन मांडणी केलेले अंदाजपत्रक आहे. यामधून संपन्न आणि सर्वसमावेशी भारत घडवून आणण्याचा दृष्टीकोन प्रस्तुत केला आहे. अर्थमंत्री आपल्या अभिभाषणात अशा म्हणाल्या की, विकासाची फळ सर्व प्रदेश व सर्व नागरीकांपर्यंत पोहचली पाहिजे. विशेषत: यामध्ये तरूण, स्त्रिया, शेतकरी, ओ.बी.सी., एस.सी. आणि एस.टी. वर्गाचा त्यांनी उल्लेख केला आहे.

भारतीय स्वातंत्र्याचे 75 वे वर्ष आपण मोठ्या उत्साहात साजरे केले. भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF) संस्थेने चमकणारा तारा (ध्रुवतारा) म्हणून मान्यता दिली आहे. 2023-2024 मध्ये आर्थिक वृद्धीचा दर 7 प्रतिशत राहील असे अनुमान अर्थमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा हा वृद्धी दर प्रमुख अर्थव्यवस्थाच्या वृद्धी दरामध्ये उच्चतम पातळीचा मानला जातो. कोविड-19 आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात मंदी येऊ घातली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था योग्य दिशेने आणि मंदिचे आव्हान स्विकारण्यास तयार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला उज्वल भविष्य असल्याचा विश्वास अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी व्यक्त केला आहे.

अर्थमंत्र्याचे लक्ष हे आर्थिक सुधारणा आणि धोरणावर केंद्रित आहे. याला अनुसरून 'सबका प्रयास' अंतर्गत जनभागीदारी आणि गरजूना मदत करण्यात आली आहे. भारताचा जागतिक पातळीवर उदय होत असून अनेक बाबी

आपण संपादित केल्या आहे. जागतिक दर्जाच्या डिजिटियल सार्वजनिक पायाभूत सुविधा यामध्ये Co-Win, UPI आणि कोव्हिड लसीकरणाचा कार्यक्रम समुहाच्या पातळीवर राबविला आहे. भारताची संरक्षणात्मक भूमिका ही हवामान बदल मिशन लाईफ (Mission Life) आणि राष्ट्रीय हायड्रोजन मिशन बाबत राहिली आहे.

कोव्हिड-19 च्या काळात कोणीही उपाशी राहणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली होती. याकरिता गेल्या 28 महिन्यांपासून मोफत धान्य वाटपाचा कार्यक्रम राबविला आहे. याचा लाभ 80 कोटी लोकांना प्राप्त झाला आहे. यामुळे अन्न आणि पोषण सुरक्षितता प्राप्त करून देण्यामध्ये आपण यशस्वी होऊ शकलो आहे. ऐवढेच नाही तर 1 जानेवारी 2023 पासून प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत अन्न आणि पोषण सुरक्षितता दिल्या जाणार आहे. यावर केंद्र सरकारचा 2 लाख कोटी रू. खर्च होणार आहे.

यावर्षी G-20 चे अध्यक्षपद भारताला प्राप्त झाले आहे. ही भारताकरिता अद्वितीय व सामर्थ्य वाढविणारी बाब आहे. यामुळे जागतिक पातळीवर भारताची भूमिका महत्वाची ठरणार आहे. G-20 चे ब्रीद अथवा घोषवाक्य 'वसुधैव कुटूंबकम्ब' आहे. यामधुन आपण आपल्या महत्वाकाक्षांना मार्गदर्शन करणार आहोत. सामुहिक-केंद्रिय कार्यक्रमपत्रिका ही जागतिक आव्हानांना संबोधित करणार आहे. यामधुन शाश्वत आर्थिक विकासाची सुविधा निर्माण केल्या जाणार आहे.

**संपादन 2014 ते 2023 पर्यंतच्या अंदाजपत्रकामधुन :-**

2014 पासून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सरकार अस्तित्वात आले. मोदींच्या आर्थिक धोरणांनी काय साध्य केले याचा शोध घेतला तर लोकांना चांगले जीवनमान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रति व्यक्ती उत्पन्न 1.97 लाख रू. पर्यंत पोहचले आहे. जागतिक क्रमवारी मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 10 व्या क्रमांकावरून 5 व्या क्रमांकावर पोहचली आहे. विविध व्यवसायाकरिता चांगले वातावरण निर्माण करून शाश्वत विकास साध्य करण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे. EPFO चे सदस्य 27 कोटी लोक आहेत. 7,400 कोटी रू. डिजिटीयल पेमेंट झालेले आहे. तर 126 लाख कोटी रू. UPI अंतर्गत डिजिटीयल ट्रांजेक्शन झालेले आहे.

समावेशी विकासाच्या योजना यशस्वी झाल्या आहे. विशेषत: यामध्ये स्वच्छ भारत मिशन, उज्वला योजना , कोव्हिड लसीकरण 102 कोटी लोकांना यशस्वीपणे झाले, पी.एम. जनधन योजनेतर्गत 47.8 कोटी रू. जमा करण्यात आले. पी.एम. सुरक्षा विमा आणि पी.एम. जीवनज्योती योजनेंतर्गत 44.6 कोटी लोकांना विमा सुरक्षितता प्रदान करण्यात आली. पी.एम. किसान निधी अंतर्गत 11.4 कोटी देण्यात आले. प्रत्यक्ष

शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये 2.2 लाख कोटी रू. हस्तांतरण करण्यात आले.

**अमृतकाळ : स्वातंत्र्याची 75 वर्ष :-**

वित्तीय क्षेत्राला प्रबळ करण्याकरिता तंत्रज्ञान वाहक आणि ज्ञानाधिष्टित अर्थव्यवस्थेसह सबळ सार्वजनिक वित्तीय क्षेत्र करायचे आहे. जनभागीदारीमधून सबका साथ सबका विकास करायचा आहे. हे अर्थसंकल्पाचे मूलतत्त्व आहे. या अर्थसंकल्पाची प्रमुख तीन उद्दिष्ट्ये आहेत. यामध्ये नागरीकांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे. विशेषत: यामध्ये युवा वर्गावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. दुसरे उद्दिष्ट सबळ वेगवान आर्थिक वृद्धी आणि रोजगार निर्मिती करणे, तिसरे उद्दिष्ट समष्टी आर्थिक स्थैर्यता निर्माण करण्याचे सामर्थ्य वाढविण्याचे आहे. स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करतांना भारत कसा असेल याचा पाया अर्थसंकल्पात रुजवला आहे. याकरिता अमृतकाळाची सप्तर्षी नियमावली प्रस्तुत केली आहे. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पटलावरचा चमकता तारा (ध्रुवतारा) आहे. या चकाकणाऱ्या ताऱ्याची चमक सातत्याने वाढविण्याकरिता व त्याचे स्थान अबाधित राखण्याकरिता सप्तीर्षीची मांडणी व विश्लेषण अर्थमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

**1) समावेशी विकास (Inclusive Growth): -**

शासनाचे मुलभूत तत्व ‘सबका साथ, सबका विकास’ आहे. यांतर्गत समावेशी विकासाला अंतर्भूत करण्यात आले आहे. यामुळे आर्थिक विकासामध्ये वंचित आणि दुर्बळ घटकांना प्राथमिकता दिल्या जाणार आहे. दिर्घकालीन गुंतवणुकीवर भर दिला गेला आहे.

**2) वंचिताची पोहोच (Reaching Last mail): -** यांतर्गत आयुष, मत्स व्यवसाय, पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय, कौशल्य विकास, जलशक्ती आणि सहकार, सिंचनाला सहाय्य, शाळांना सहाय्य, डिजिटायझेशन यावर लक्ष केंद्रित केल्या जाणार आहे.

**3) पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक: -**

पायाभुत सुविधा मधील गुंतवणुक वाढवली तर ती उत्पादक क्षमता सुधारते. याचा आर्थिक वृद्धी व रोजगारावर गुणक परिणाम दिसून येतो. यांतर्गत खाजगी गुंतवणूक वाढवायची आहे. कोव्हीड-19 नंतर गुंतवणूक वाढवून सृष्ट चक्र निर्माण करायचे आहे. परिणामत: यामधून रोजगार निर्मती घडवून आणायची आहे.

**4) क्षमता विकास (Unleashing the Potential): -**

सुशासन निर्माण करायचे आहे. सुशासन राष्ट्राच्या प्रगतीचा गाभा आहे. शासनाचे कार्य पारदर्शक व्यवहार आणि प्रशासनाचे मापण यांच्याशी बांधिलकी जपणारे आहे. अशा प्रकारचे कार्य सामान्य माणसाचे जीवनमान उंचावते आणि कल्याण घडवून आणते.

**5) हरित वृद्धी (Green Growth): -**

पर्यावरणाशी संतुलित जीवनशैलीवर भर द्यायचा आहे. पर्यावरण जागरूक जीवनशैली चळवळीला प्रेरणा द्यायची आहे. एकूण शुन्य कार्बन उत्सर्जन कार्यक्रम इ.स. 2070 पर्यंत राबवायचा आहे. यांतर्गत हरित उद्योग आणि आर्थिक संक्रमण घडून येणार आहे. यामधून हरित वृद्धीवर लक्ष्य केंद्रित केल्या जाणार आहे.

**6) युवा शक्ती (Yooth Power): -**

युवकांना सक्षम करण्याकरिता अमृतपेढी मदत करणार आहे. युवा शक्तीला अमृत पेटी म्हणून संबोधले आहे. युवकाच्या स्वप्नांना वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याकरिता नवीन शैक्षणिक धोरणाची मांडणी केली आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याला अनुसरून आर्थिक धोरणे आणि रोजगार निर्मिती केल्या जाईल व व्यावसायिक संधी निर्माण केल्या जाणार आहे.

**7) वित्तीय क्षेत्र (Financial Sector): -**

वित्तीय क्षेत्रामधील सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा नवप्रवर्तनीय उपयोग यामुळे वित्तीय समावेशनामध्ये पुढाकार घेतला जाईल. वित्तीय समावेशनामधून वित्तीय बाजारामधील सहभाग, कर्जामधील प्रवेश, सेवाच्या प्रस्तुतीकरणाचे मापण, योग्यता आधिक्याने वेगवान केल्या जाणार आहे.

अंदाजपत्रक 2023-2024 मध्ये वरिल सात प्राथमिकताचा स्विकार केला आहे. या सात प्राथमिकता एकमेकिंना पूरक आहे. यांना सप्तर्षी म्हणून संबोधले आहे. हि सप्तर्षी अमृतकाळ ते शताब्दी काळ (2023-2047) याकरिता लागू केली आहे.

**अंदाजपत्रकाचे उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण :-**

केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024 सादर करतांना अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी केंद्रिय अंदाजपत्रकाचा आकार 45.03 लाख कोटी रू. असल्याचे म्हटले आहे. शासन उत्पन्न प्राप्ती आणि खर्च कशा प्रकारे करणार आहे याचे विवेचन पुढील तक्ता क्र. १ च्या आधारे करणार आहोत.

2023-2024 च्या अंदाजपत्रकामध्ये शासनाला करापासून 33.60 कोटी रू. उत्पन्न मिळण्याचे अनुमान आहे. हे उत्पन्न वस्तु व सेवाकर, उत्पादन शुल्क, निगम कर, आयात व निर्यात कर आणि इतर स्त्रोतापासून प्राप्त होणार आहे. सर्वात जास्त उत्पन्न वस्तू आणि सेवा करामधून 9.56 लाख कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. निगम कर 9.22 लाख कोटी रू. उत्पन्न कर 9 लाख कोटी रू. करेत्तर उत्पन्न 3.01 लाख कोटी रू., भांडवलावरील उत्पन्न 84 हजार कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. 2023-2024 च्या अंदाजपत्रकामध्ये शासनाला करापासून 33.60 कोटी रू. उत्पन्न मिळण्याचे अनुमान आहे. हे उत्पन्न वस्तु व सेवाकर, उत्पादन शुल्क, निगम कर, आयात व निर्यात कर आणि इतर स्त्रोतापासून प्राप्त होणार आहे. सर्वात जास्त उत्पन्न वस्तू आणि सेवा करामधून 9.56 लाख कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. निगम कर 9.22 लाख

कोटी रू. उत्पन्न कर 9 लाख कोटी रू. करेत्तर उत्पन्न 3.01 लाख कोटी रू., भांडवलावरील उत्पन्न 84 हजार कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

**तक्ता क्र. १**

**केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024**

**उत्पन्न व खर्च**

| अ.क्र. | महसुली उत्पन्न | प्रतिशत | अ.क्र. | महसुली खर्च | प्रतिशत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | ऋण आणि प्रतिभूती | 34% | 1. | व्याज देणे | 20% |
| 2. | करेत्तर प्राप्ती | 6% | 2. | केंद्रिय सहाय्यित योजना | 9% |
| 3. | ऋणेत्तर भांडवल प्राप्ती | 2% | 3. | अर्थसहाय्य | 8% |
| 4. | आयात व निर्यात | 4% | 4. | संरक्षण | 8% |
| 5. | वस्तू व सेवा कर | 17% | 5. | केंद्राच्या योजना | 17% |
| 6. | निगम कर | 15% | 6. | वित्त आयोग व इतर | 9% |
| 7. | उत्पादन शुल्क | 7% | 7. | कर आणि शुल्क | 18% |
| | **(महसुली खर्च)** | | | **राज्याचा वाटा** | |
| 8. | उत्पन्न कर | 15% | 8. | इतर खर्च | 8% |
| | | | 9. | पेंशन | 4% |
| | **एकूण उत्पन्न** | **100 %** | | **एकूण खर्च** | **100%** |

स्रोत- Key feature of budget २०२३-२०२४ Govt. of India

शासनाला उत्पन्न प्राप्ती होते तसाच वेगवेगळ्या विभागावर खर्च देखील करावा लागतो. अंदाजपत्रकामध्ये शासन संरक्षणावर 5.14 लाख कोटी रू, पायाभूत सुविधांवर 5.1 लाख कोटी रू, अन्न आणि सार्वजनिक वितरण 2.06 लाख कोटी रू, गृह खाते 1.96 लाख कोटी रू, रसायने, खते 1.78 लाख कोटी रू, कृषी आणि ग्रामिण विकास 2.85 लाख कोटी रू. तर दळणवळणावर 1.23 लाख कोटी रू. खर्च केल्या जाणार आहे.

वरिल विवेचनावरून लक्षात येते की, सरकारला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापेक्षा खर्च हा जास्त करावा लागणार आहे. याकरिता सरकार बाजारातून कर्ज घेते. यामुळे सरकारची वित्तीय तुट वाढते. अंदाजपत्रकामध्ये तुट 17.86 लाख कोटी

रू. आहे. वित्तीय तुट जीडीपी च्या 6.4 प्रतिशत आहे. प्रत्यक्षात ही राजकोषीय तुट 3 ते 3.5 प्रतिशत असायला पाहिजे आहे. म्हणजेच राजकोषीय तुटीचे प्रमाण जवळपास 2.9 प्रतिशतने जास्त आहे. एकूण उत्पन्नाच्या तुलनेत एकूण खर्चाचा विचार केला तर वित्तीय तुट 37 प्रतिशतने जास्त आहे. राजकोषीय नियमनाच्या दृष्टिकोणातुन ही वित्तीय तुट फार जास्त आहे. म्हणून (1) शासनाला उत्पन्न वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. (2) उत्पनाचे नविन स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. (3) निगम कर वाढविण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे. पण सरकार निगमांना झुकते माप देत आहे.

गेल्या नऊ वर्षापासुन (2014 ते 2022) भारतीय अर्थव्यवस्थेने उदय पावणारी अर्थव्यवस्था म्हणून जागतिक पातळीवर स्थान प्राप्त केले आहे. गेल्या नऊ वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा सरासरी आर्थिक वृद्धीचा दर 6 ते 7 प्रतिशत राहिला आहे. आता उदय पावणारी अर्थव्यवस्था हे स्थान मागे टाकून चमकता तारा (ध्रुवतारा) म्हणून नवी ओळख भारतीय अर्थव्यवस्थेने निर्माण केली आहे. मेक इन इंडिया, हवामान बदल, कोव्हिड-19 शी दिलेला लढा यामुळे भारताला नवी आशा आणि आत्मविश्वास निर्माण झालेला आहे.

महत्वाचे म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात वाढ घडून आलेली आहे. यामध्ये समाजाचा प्रत्येक घटक आणि वृद्धीचा प्रत्येक पैलू समाविष्ट आहे. भारताची जागतिक क्रमवारीमध्ये सुधारणा झालेली आहे. World Bank Final Case of doing च्या निर्देशांकामध्ये भारत हा 142 व्या स्थानावर होता. यामध्ये सुधारणा होऊन आता 63 व्या क्रमांकावर पोहचला आहे. शेतकऱ्यांकरीता 2.25 लाख कोटी रू. वित्तीय सहाय्य आणि दोन कोव्हिड-19 विरोधी लसीचे भारताने केलेले उत्पादन (Covaxin आणि Covidshild) यामधुन आत्मनिर्भर भारताचा नवीन अध्याय सुरू झाला आहे. या दृष्टिकोनाची पुष्टी 2023-2024 च्या अंदाजपत्रकातून मिळते. सध्या जग हे अरिष्टामधून पुढे जात आहे. या अरिष्टांचा सामना करण्याकरिता भारतीय व्युहरचना अमृतकाळ ते शताब्दी काळ राहणार आहे. यामधुन भारताच्या सामर्थ्याची बांधणी केल्या जात आहे. उच्च उदयमशील क्षमता निर्माण केल्या जात आहे. सबळ राजनयाचा याला आधार राहणार आहे. जागतिक पातळीवर भारताचा सांस्कृतिक पुर्नउदय घडून येत आहे. या अंदाजपत्रकाला सप्तर्षीचा आधार आहे. धोरणाची निर्मिती व प्रत्यक्ष वापर हा लढा देण्याचा विश्वास निर्माण करणारा आहे.

**पायाभूत विकास :-**

पायाभूत विकास हा आर्थिक वृद्धीचा केंद्रबिंदू आहे. पायाभूत सुविधामधील गुंतवणुकीमुळे रोजगार आणि उपभोगाला चालना मिळणार आहे. 2023-2024 च्या अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चाची तरतूद

(गुंतवणूक) एकूण खर्चाच्या 33 प्रतिशत करण्यत आली आहे. भांडवली खर्चमध्ये वाढ 10 लक्ष कोटी रू. नी केलेली आहे. रेल्वेच्या भांडवली खर्चामध्ये सर्वात जास्त वाढ केली आहे. ही वाढ 48 प्रतिशत आहे. हा भांडवली खर्च 2.4 लाख कोटी रू. राहणार आहे.

आर्थिक विकासाचा वेग वाढावा याकरिता 100 पेक्षा जास्त वाहतून प्रकल्प, बंदरे, कोळसा, पोलाद, खते आणि अन्नधान्य क्षेत्राकरिता निर्माण केल्या जाणार आहे. याकरिता 75,000 कोटी रू. गुंतवणूक केल्या जाणार आहे. यामध्ये 15,000 कोटी रू. गुंतवणूक खाजगी क्षेत्राची राहणार आहे. याला जोडून 50 एअरपोर्ट, हेलिपॅड, Water aerodromes, Advanced Janding & grownds निर्माण करण्याचे लक्ष 100 पर्यंत आहे. यामुळे सामान्य माणसासाठी प्रवेशित व किफायतशीर विमान प्रवास करण्याचे स्वप्न खरे ठरणार आहे.

**सामाजिक सुरक्षितता :-**

राष्ट्राच्या बांधणीमध्ये सहभागी होवून सिमांत लोकांकरिता सुरक्षा जाळे निर्माण करून दुर्बळ व वंचिताना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. पी.एम. आवास योजनेअंतर्गत लोकांना आवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. याकरिता 500 गटांची ओळख निर्माण करण्यात आली आहे. ही ओळख महत्वाकांक्षी गट कार्यक्रमामधून देण्यात आली आहे. यांतर्गत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि घराच्या सुविधाची निर्मिती करण्यात आलेली आहे. शासनाने अंदाजपत्रकामधून वंचित व दुर्बळाना विविध सुविधामध्ये प्रवेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

जन-जीवन मिशनकरिता 70,000 कोटी रू. आंवटित करण्यात आले आहे. उपाशीपोटी कोणी झोपू नये याकरिता अन्नधान्याच्या पुरवठ्याची तरतुद करण्यात आली आहे. याचा पुरावा 80 कोटी लाभार्थींना झालेला आहे. शासन आर्थिक वृध्दीच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये सर्वसमावेशकतेला बिंबवत आहे. PM-PVTG (असुरक्षित आदिवासी समुह) याकरिता 15,000 कोटी रू. आंवटित करण्यात आले आहे. विकासाचे ध्येय शाश्वत जीविकेच्या संधी निर्माण करणे याकरिता शिक्षण, आरोग्य व पोषण, रस्ते व दूरसंचार क्षेत्राचा विकास वेगाने घडवून आणायचा आहे.

**युवा विकास :-**

जनभागीदारीमध्ये विकासाला वाहून घेतल्या जाणार आहे. देशाला युवा शक्तीवर मोठा विश्वास आहे. श्रमशक्तीचे प्रतिबिंब म्हणजे शिक्षण होय. शिक्षणावरचे आवंटन वाढविलेले आहे. सोबतच प्रशिक्षणावरचा भर वाढविलेला आहे. पी.एम. कौशल्य विकास योजना 4.0 मध्ये स्टायपेंड (Stipend) सहाय्य म्हणून पुरेशा प्रमाणात पुरवल्या जाणार आहे. युवकांकरिता India

National Apprenticeship Promotion Scheme राबविल्या जाणार आहे.

Unified Skill India Digital Platfrom ची संकल्पना राबविल्या जाणार आहे. कौशल्यासाठी Digitl Ecosystem चा विस्तार केल्या जाणार आहे. मागणी आधारीत सामान्य कौशल्याला सक्षम करणे, सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगामध्ये रोजगार निर्मिती करणे. उद्योगामध्ये प्रवेश करण्याकरीता सुविधा पूर्ण योजनांची निर्मिती करणे, 5-जी च्या सेवा देण्याकरिता 100 प्रयोगशाळा विकसित करणे याकरिता अभियांत्रिकी संस्था कडून प्रत्यक्ष नवीन संधीचा विकास आणि प्रारूपाची मांडणी केल्या जाणार आहे.

**कृषी क्षेत्र व संरक्षण क्षेत्र :-**

कृषी क्षेत्रामध्ये डिजिटियल संरचनाच्या वृद्धीवर बजट मध्ये भर दिलेला आहे. याकरिता कृषी प्रवेग निधी उभारल्या जाणार आहे. याद्वारे शेतकऱ्यांना किफायतशीर प्रवेश तंत्रज्ञानामध्ये मिळण्याचा विश्वास अर्थमंत्र्यांनी दर्शविला आहे. उत्पादन वाढीबरोबरच स्थानिक पातळीवर कृषी माल साठवणुकीची व्यवस्था करणे, ज्वारी, बाजरी, मका, यासारख्या भरड धान्याचे प्रमुख केंद्र म्हणून भारताला तयार करण्याची कल्पना व अंमलबजावणी केल्या जाणार आहे.

संरक्षण विभागावर विशेष लक्ष दिलेले आहे. संरक्षण खर्चामध्ये 20 प्रतिशतने वाढ केलेली आहे. या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षणावर एकूण 5.94 लाख कोटी खर्च करण्याची तरतूद केली आहे. यापैकी शस्त्रात्र खरेदीसाठी 1.62 लाख कोटी रू. ची तरतूद केली आहे. यामध्ये लढाऊ विमाने, युद्ध नौका आणि संरक्षण सामग्रीचा समावेश आहे. चीन सारख्या शेजारी राष्ट्राच्या वाढत्या राष्ट्रविरोधी कृती लक्षात घेऊन हा खर्च वाढविणे आवश्यक आहे.

**सक्षम आणि समावेशी अर्थव्यवस्था :-**

अमृतकळाचा दृष्टिकोन हा ज्ञानाधिष्टित अर्थव्यवस्थेचा आहे. यासह सबळ सार्वजनिक वित्त आणि वित्तीय क्षेत्राला मजबूत करायचे आहे. याला संपादित करण्याकरिता जनभागीदारी कडून सबका साथ सबका विकास प्रयास आवश्यक आहे.

आर्थिक विकास कार्यक्रम पत्रिकेला संपादित करण्याच्या दृष्टीकोनावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यक आहे. हे लक्ष प्रामुख्याने तीन घटकावर अवलंबून आहे. अ) नागरीकांसाठी सुविधांची संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे. विशेषत: यामधून युवा वर्गाच्या आकांक्षा परिपूर्ण होतील. ब) आर्थिक वृद्धी आणि रोजगार निर्माण करण्याकरिता सबळ प्रेरणाची तरतूद करणे. क) समष्टी आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे.

आपले आर्थिक वृद्धी व विकासाचे ध्येय स्वातंत्र्याच्या 100 व्या वर्षापर्यंत लक्ष्य केंद्रित करणारे आहे. खाली दिलेल्या चार संधी निर्माण करतांना अमृतकाळाच्या दरम्यान हस्तांतरणं घडून येणार आहे.

**अ) स्त्रीयांकरिता आर्थिक सक्षमीकरण :-**

दिनदयाल अंत्योदय योजना आणि नॅशनल रूरल लाईव्हहुड मिशन (National Rural Livelihood Mission) यांनी नोंद घेणारे यश संपादित केले आहे. याचा लाभ ग्रामीण भागातील स्वयंचलित गटामधील 81 लाख स्त्रीयांना झालेला आहे. यामध्ये स्त्रीयांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आपण पोहोचलो आहोत. याकडून जास्त उत्पादकता उदयमशीलता आणि संगनमत घडून येण्याची मांडणी झालेली आहे. याचे हजारो सदस्य आहेत आणि व्यावसायिक समायोजन घडून आलेले आहे. याद्वारे कच्चा मालाच्या पुरवठ्याला मदत होते. चांगल्या रचना, गुणवत्ता ब्रँड आणि बाजार त्यांच्या उत्पादनाला प्राप्त होतो. याकडून आर्थिक धोरणाला मदत होते. मोठ्या उपभोक्ता बाजाराला सेवा देऊन त्याला हाताळतांना त्याचे कार्य सक्षम होते. यामधून अनेक स्टार्ट अप उद्योग वृद्धींगत होत आहे.

**ब) पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना:-**

या शतकामध्ये पारंपारिक कला व कौशल्य असणारे लोक यांच्या हस्तकला व हस्तकाम प्रसिद्ध आहे. त्यांचे हात म्हणजेच साधन आहे. भारतामध्ये अशी साधने व कला प्रसिद्ध आहेत. सामान्यपणे प्रसिद्ध अशा हस्तकलाचा उल्लेख विश्वकर्मा म्हणूनच केला जातो. कला आणि हस्तकौशल्य निर्मिती ही खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर भारताचा पाया आहे. पी.एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही सहाय्य करण्याचे पॅकेज आहे. ही नवीन योजना सक्षमीकरण घडवून गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणते. त्याच्या उत्पादनाचे प्रमाण आणि पोहोच याचे एकत्रिकरण सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या (MSEM) मूल्य श्रृंखलेमध्ये एकत्रित आहे. योजनेच्या घटकामध्ये समाविष्ट आहे. केवळ वित्तीय सहाय्यच दिले जात नाही तर पुढारलेले कौशल्य व प्रशिक्षणाला प्रवेश देणे, आधुनिक डिजिटियल तंत्रज्ञानाचे ज्ञान, कार्यक्षम हरित तंत्रज्ञान, ब्रँडची उन्नती, स्थानिक आणि जागतिक बाजाराची ओळख निर्माण करणे, डिजिटियल पेमेंट आणि सामाजिक सुरक्षितता समाविष्ट आहे. याचे लाभ सामान्य लोक आणि दुर्बळ घटकांना मिळणार आहे.

**क) पर्यटन :-**

देशीय आणि विदेशी पर्यटकाकरिता प्रचंड आकर्षणाच्या संधी निर्माण केल्या जाणार आहे. पर्यटनामध्ये प्रचंड क्षमता आहे. हे क्षेत्र अनेक प्रक्रारच्या संधी निर्माण करणारे क्षेत्र आहे. यामुळे युवकांना रोजगार आणि उदयमशीलतेच्या संधी प्राप्त होणार आहे. पर्यटनाला प्रोत्साहन देऊन ध्येय प्राप्ती केल्या जाणार आहे. यामध्ये राज्याचा कृतीशील सहभाग राहणार आहे. शासनाचा कार्यक्रम एककेंद्रभिमुख असून सार्वजनिक, खाजगी सहभाग राहणार आहे.

**ड) हरित वृद्धी :-**

हरित इंधन, हरित उर्जा, हरित शेती याबाबतच्या हरित गतिशीलता, हरित बांधणी आणि हरित साधने व धोरणामुळे अर्थव्यवस्थेच्या

विविध क्षेत्रामध्ये याचा कार्यक्षमपणे उपयोग होणार आहे. हरित वृद्धीचा परिणाम घडून अर्थव्यवस्थेमधील कार्बन तीव्रता कमी केल्या जाणार आहे. यामधून हरित रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहे.

**इ) हरित संक्रमण :-**

हरित संक्रमणामधून शाश्वत औद्योगिक विकासाला मदत केल्या जाणार आहे. यामधून जागरूक आणि जबाबदारपूर्ण आर्थिक वृद्धी संपादित केल्या जाणार आहे. याकरिता 35,000 कोटी रू. चा निधी हा भांडवली गुंतवणूक म्हणून वितरीत करण्यात आलेला आहे. यामधून उर्जा हस्तांतरण आणि एकूण शुन्य उद्दिष्ट साध्य केल्या जाणार आहे. मागच्या 2022-2023 च्या अंदाजपत्रकामध्ये वाहन स्क्रॅपिंग धोरण नमुद करण्यात आले होते. केंद्र सरकारद्वारे याकरिता निधी वितरीत करण्यात आला होता. यामुळे जुन्या वाहनांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे.

अर्थव्यवस्थेतील सहयोगी क्षेत्र आर्थिक वृद्धीला उत्तेजन देत असते. विशेषत: लोखंड, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्वामध्ये कपात होऊ शकते. हरित मार्गावर जाण्यासाठी स्क्रॅप स्टिलचा (Scrup Steel) उपयोग होईल. यामध्ये नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन महत्वपूर्ण भूमिका पार पाडणार आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनामध्ये कपात घडून येईल. तसेच जीवाश्म इंधनावरिल अवलंबित्वामध्ये कपात घडून येईल.

अंदाजपत्रकाचा हा क्षण म्हणजे आपण योग्य दिशेने जात आहोत. ही तात्काळ घडून येणारी कामगिरी नसून आर्थिक पुर्नरूत्थान आहे. जे शाश्वत नसून अल्पकालीन आहे. याचे परिणाम पुढील दशकामध्ये दिसणार आहेत. भारताने 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून स्थान प्राप्त केले आहे. सध्याच्या आर्थिक विकासाबाबत आणि शताब्दी वर्षाच्या भवितव्याबाबत प्रधानमंत्री यानी म्हटले की, जग वृद्धींगत होत आहे तसाच भारत देखीजल वृद्धींगत होत आहे. असे असतांना भारतामध्ये आर्थिक सुधारणा घडून येत आहे. जगातील आर्थिक सुधारणाचा लाभ भारताला विशेष शक्ती म्हणून होणार आहे.

**उद्योग, मागणी आणि खर्च :-**

केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024 हे अमृतकाळातील पहिले बजट आहे. अत्यंत बिकट स्थितीतून आपण जात असतांना अपेक्षित सकारात्मक भावना शेअर बाजारामधून दिसून आल्या. अंदाजपत्रक जेव्हा सादर झाले तेव्हा एका मोठ्या व्यावसायिक समुहाच्या (अदाणी समुह) शेअर किंमती तीव्रतेने घसरल्या होत्या. या पार्श्वभूमीवर उद्योग समुहाचा गट आणि उजव्या विचारसरणींच्या अर्थशास्त्रज्ञांनी परिस्थितीला सावरण्यास मदत करून सरकारमध्ये पुर्नविश्वास निर्माण केला.

अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर उद्योग समुह गट आनंदी होते. वित्त मंत्र्यांनी गतिमान

आधिक्य साधने देण्याचे टाळले आहे. लघु उद्योग आणि नवीन कल्याणकारी कार्यक्रमांना निधी देण्याचे टाळले आहे. वित्तीय दुरूस्तीवर अधिक्याने भर दिलेला होता. वित्तीय तुटीचे मापण सातत्याने केले जाऊन तो कमी करण्याचा प्रयत्न केला जात होता. याऐवजी भांडवली खर्चामध्ये वाढ करण्यात आली आहे. यामध्ये सिमांत वाढ जीडीपी च्या 0.6 प्रतिशने केली आहे. यामुळे खाजगी गुंतवणूक वाढून आर्थिक वृद्धीचा वेग वाढेल असा दावा वित्त मंत्र्यांनी केला आहे.

शासनाने कितीही चकचकीत करून अंदाजपत्रकाची मांडणी केली असली तरीही प्रत्यक्ष उपभोग मागणीमध्ये मोठी तुट निर्माण झाली आहे. यामधील क्षती भरून काढण्याची गती शासनाने गमावलेली आहे. 2022-2023 मध्ये आर्थिक वृद्धीचा दर 7 प्रतिशत असल्याचे म्हटल्या गेले. दुसऱ्या तिमाहीमध्ये आर्थिक वृद्धीचा दर घसरून 4.5 प्रतिशत झाला होता. औद्योगिक वृद्धीचा दर गेल्या पाच वर्षापासून - 2 प्रतिशत आहे. सोबतच स्फिती वाढत आहे. वास्तव प्रति व्यक्ती उत्पन्न स्थिर आहे. प्रतिव्यक्ती अंतिम उपभोग खर्च 5.9 प्रतिशतवर गेल्या तीन वर्षापासून स्थिर राहिलेला आहे.

सध्या देशीय मागणीमध्ये घसरण झाल्याचे दिसून येते. विशेषत: ग्रामीण भागातील मागणीमध्ये घसरण झालेली आहे. याचा पुरावा म्हणजे दुचाकी आणि त्रिचाकी वाहनाच्या मागणीमध्ये प्रचंड घसरण झालेली आहे. ही वाहने ग्रामीण भागाच्या मागणीचे प्रतिनिधीत्व करतात. ही मागणी कोरोनापूर्व काळापेक्षा कमी झालेली आहे. मनरेगा कार्यक्रमांतर्गत रोजगारासाठी मागणी आहे. यामधून सातत्याने ग्रामिण भागाच्या समस्या दिसून येतात. याचे बाह्यदृश्य बघितले तर सबळ प्रतिरोधचक्रिय (Countercyclical) वित्तीय प्रतिसाद आहे. अंदाजपत्रकीय आंवटन व सद्यस्थितीतील परिस्थितीवर मात करण्यास चालना देऊ शकतो यामधून खात्रीशीरपणे शाश्वत पुर्नभरण घडून येवू शकते.

मात्र गेल्या तीन बजट पासून सरकारने खर्च कमी करण्यावर भर दिलेला आहे. बजटच्या समग्र खर्चामध्ये स्थिरपणे घसरण घडून आलेली आहे. ही खर्चामधील घसरण 3 प्रतिशतने झालेली आहे. समग्र खर्चाचे प्रमाण 2020-2021 मध्ये जी.डि.पी. च्या 17.7 प्रतिशत होते ते घसरुण 2023-2024 मध्ये 14.9 प्रतिशत झालेले आहे. केंद्र सरकारच्या बजटमधील कमी खर्चाचा नकारात्मक परिणाम दिसून आला आहे. प्रतिरोधचक्रिय आर्थिक स्थितीद्वारे आंशिक क्षतीपूर्तीचा स्विकार राज्याने बजटमध्ये केला आहे. प्रतिरोधचकिय आर्थिक निती ही सरकारच्या खर्च कमी करण्याला चालना देते.

याहीपुढे जाऊन केंद्र सरकारने केंद्रिय अंदाजपत्रकाच्या संबंधित खर्चाच्या आकारमानामध्ये कपात केली आहे. प्राप्ती खर्चाच्या द्वारे बजटमध्ये सुविधा दिल्या जातात. आवर्ती खर्च/वारंवार होणारा खर्च (Recurring

Expenditure) जो सामान्य लोकांपर्यंत जलद गतीने झिरपत जातो. हा खर्च बजट आवंटन करतांना जी.डी.पी. च्या 4 प्रतिशत केला गेला आहे. याचा परिणाम असा झाला की, अर्थव्यवस्थेच्या एकूणच मागणीमध्ये घसरण निर्माण झाली आहे. परिणामत: क्षतिपुर्ती अथवा पुर्न:भरण घडून येण्यामध्ये दुर्बलता निर्माण झाली आहे. जानेवारी 2023 पासून निर्यातीमध्ये ऋणात्मक दराने वृद्धी घडून येत आहे. निर्यात वृद्धीला आर्थिक वृद्धीचे इंजिन मानल्या जाते. मात्र निर्यातीमधील ऋणात्मक वृद्धी ही मागणी टिकवून ठेवण्यात अपयशी ठरत आहे.

धक्कादायक बाबी अशा आहे की, केंद्रिय अंदाजपत्रकामध्ये खर्च कमी करण्यावर भर दिला आहे. अनेक मार्गानी हा खर्च कमी केल्या जाणार आहे. याचा नकारात्मक परिणाम राज्यावर आणि न्युन उत्पन्न गटावर होणार आहे. गेल्या तीन वर्षापासून राज्यांना हस्तांतरीत करण्यात येणारा खर्च 6.2 प्रतिशने कमी केलेला आहे. यामुळे केंद्राच्या योजना व त्यांचा आकार आकुंचित पावला आहे. राज्यांना कमी निधी दिला जात आहे.

केंद्र सरकारच्या आकुंचित होत जाणाऱ्या आकारमानाचा झटका शासनाच्या अनुदानाना बसत आहे. अनुदानाचे प्रमाण 2020-2021 मध्ये जी.डी.पी. च्या 3.6 प्रतिशत होते. ते घसरून 2023-2024 मध्ये जी.डि.पी. च्या 1.3 प्रतिशत करण्यात आले. 2023-2024 मध्ये एकूण अनुदाने 4.03 लाख कोटी रू. ची आहे. 2022-2023 च्या तुलनेत यामध्ये 1.5 लाख कोटी रू. कमी करण्यात आले आहे. अन्नधान्यावरील अनुदाने 2022-2023 मध्ये 2.87 लाख कोटी रू. होते. यामध्ये कपात करून 2023-2024 मध्ये 1.97 लाख कोटी रू. करण्यात आले आहे. गेल्या तीन वर्षामध्ये शासनाच्या अनुदानामध्ये प्रचंड प्रमाणात घसरण घडून आलेली आहे. हे प्रमाण 2/3 झालेले आहे. मोठ्या प्रमाणात कपात अन्नधान्यावरील अनुदानामध्ये करण्यात आलेली आहे. तीन निम्याने कमी करून केवळ जी.डी.पी. च्या 0.6 प्रतिशत झालेली आहे. अशीच प्रवृत्ती समांतरपणे व्याजदर अनुदानाच्या बाबत आहे. यामध्ये भर घालणारी बाब म्हणजे मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) करिता अंदाजपत्रकीय आवंटन कमी करण्यात आलेले आहे.

परिणामत: मागणी बाजूने प्रचंड प्रमाणात घसरण करण्यात आलेली आहे. यावर वित्त मंत्रालयाने असा दावा केला आहे की, मागणी बाजूने झालेल्या घसरणीची भरपाई अथवा क्षतिपुर्ती भांडवली खर्चामध्ये वाढ करून केल्या जाणार आहे. भांडवली खर्चामध्ये वाढ केल्याचा गुणक प्रभाव दिसून येणार आहे. नमुद करण्यायोग्य बाब म्हणजे सरकारने भांडवली खर्च हा दुप्पट केला आहे. हा खर्च 2019-2020 मध्ये जी.डी.पी. च्या 1.7 प्रतिशत होता. यावरून तो जी.डी.पी. च्या 3.3 प्रतिशत करण्यात आलेला आहे. या बजटमध्ये भांडवली खर्चात जी.डी.पी. च्या 0.6 प्रतिशतने

वाढ करण्यात आली आहे. मात्र भांडवली खर्चामधील वाढ अत्यंत कमी दराने केलेली आहे. प्रामुख्याने भांडवली खर्च हा रस्ते, रेल्वे, पेट्रोलियम पदार्थ, नैसर्गिक वायू याकरिता केल्या जाणार आहे. मात्र इतर महत्वाच्या क्षेत्रांना मात्र भांडवली खर्चाचे मर्यादित लाभ मिळणार आहे.

आधिक्याने उत्पन्न करामध्ये झालेली कपात मध्यम वर्गाला चांगले भासवणारी (Feel – good) आहे. याचा कोणताही परिणाम उपभोक्ता मागणी वाढीवर घडून येणार नाही. याचे लाभ मोठे लाभार्थी म्हणजेच मोठ्या करदात्यांना होणार आहे. याचे लाभ निगम क्षेत्र आणि निगमत्तेर क्षेत्रातील करदात्यांना होणार आहे. अन्न, इतर अनुदाने आणि रोजगार कार्यक्रमावरील खर्च कमी होतो आहे. म्हणून सरकारने अमृतकाळाला समृद्ध आणि सशक्त म्हटल्या गेले असले तरी तो अर्थव्यवस्थेसाठी नाही असेच म्हणावे लागेल.

**समारोप :-**

मानव विकास निर्देशांकामध्ये भारत 191 देशांमध्ये 132 व्या स्थानावर आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक 0.633 आहे. याचा अर्थ भारताला आरोग्य, शिक्षण व प्रति व्यक्ती उत्पन्न वाढीसाठी भरीव योगदान व गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे. जागतिक भूक निर्देशांक (Global Hunger Index) मध्ये 121 देशाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक 107 वा आहे. जी अत्यंत गंभीर स्थिती मानल्या जाते. यामुळे अन्नधान्यावरील खर्चात कपात करून चालणार नाही. फेब्रुवारी 2023 मध्ये 8.3 प्रतिशत उच्चतम बेरोजगारीचा दर होता. तर स्फितीचा दर 6.7 प्रतिशत होता. वित्तीय तुट 6.4 प्रतिशत आहे. या पार्श्वभूमीवर सप्तर्षीचे चित्र चांगल्या रितीने रंगवल्या गेले असले तरी ते पुढे घेऊन जाणे आव्हान आहे. चांगले शिक्षण, चांगले आरोग्य, जीवनमानाचा स्तर उंचावणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षात आपण साध्य हि उदिष्ट करू शकण्यात कमी पडलो हे आव्हान आहे. प्रति व्यक्ती उत्पन्न वाढवू शकलो नाही. यामुळे आर्थिक विषमता कशी कमी होईल याचे उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. या सर्व आव्हानांना प्रत्यक्षात धोरणकर्ते कसा आकार देईल हे देखील आव्हान आहे. आपण अर्थसंकल्पामध्ये समावेशी विकासाला स्थान दिलेले आहे. मानव विकास, मुलभुत गोष्टींची प्राप्ती, सन्मानाने जगायला मिळणे ही समावेशी विकासाची ध्येय आहे. याचा विचार धोरणाच्या मध्यवर्ती असण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :-**


- जहागिरदार, दि. व्यं. (२०२३). विविध उद्दीष्टे साध्य करू इच्छिणारा अर्थसंकल्प, १३ फेब्रुवारी, दै. हिंदुस्थान.
- Sitaraman, Nirmala. (2023). Budget 2023-2024 Speech of Ministry of

Finance, Government of India, 1 February

- Ministry of Finance, (2023). Key Featuris of Budget 2023-2024, Government of India.
- Scindia, Jyotirditya. (2023). The worlds oor oyster, 6 February, The Economic Times.
- Munal, Pawan. (2023). Stage is set for Lift - off, 7 February, The Economic Times.